**१) लॉकर ब्रेकओपन करण्याविषयी नियमावली :-**

१२.१) लॉकरधारकाने सतत तीन वर्षे भाडे थकित ठेवल्यास,

अ) लॉकरधारकास लॉकर करारनामा समाप्तीपत्र (Termination Letter) (नमुना ७) पाठवावे व लॉकर भाडे भरण्यासाठी तीन महिन्यांची मुदत द्यावी.

ब) जर लॉकरधारकाने लॉकर करारनामा समाप्तीपत्र पाठविल्यानंतर सुध्दा तीन महिन्यापर्यंत लॉकर भाडे अदा केले नाही तर लॉकरधारकास लॉकर ब्रेकओपन संदर्भात पत्र पाठवावे व त्यासाठी लॉकरधारकास अजून तीन महिन्यांचा कालावधी द्यावा. (नमुना ८)

क) जर लॉकरधारकाने लॉकर ब्रेकओपन पत्र पाठविल्यानंतर तीन महिन्यापर्यंत लॉकर भाडे भरले नाही तर बँक लॉकर ब्रेकओपन करण्यासंदर्भातची नोटीस एक इंग्रजी वर्तमानपत्रातून व दुसरी स्थानिक भाषेतील वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी व यामध्ये जर लॉकरधारकाने तीन महिन्यामध्ये लॉकर भाडे अदा न केलेस लॉकर ब्रेकओपन केले जाईल असा उल्लेख असावा.

वरील सर्व बाबींची पूर्तता झालेनंतर सुध्दा लॉकरधारकाने भाडे न भरल्यास बँकेने खालीलप्रमाणे लॉकर ब्रेकओपन करण्याची कार्यवाही करावी-

१) शाखेने लॉकर ब्रेकओपन करणाऱ्या एजन्सीशी संपर्क साधावा.

२) लॉकर ब्रेकओपन करताना बँकेचा एक अधिकारी तसेच दोन स्वतंत्र साक्षीदार असावेत व या व्यक्तींचा जबाब नोंदवून त्यांच्या सह्या घ्याव्यात.

३) लॉकर ब्रेकओपन करताना पुराव्यासाठी व्हिडोओ शूटींग करण्यात यावे व ते सुरक्षित ठेवण्यात यावे.

४) शेजारच्या लॉकरला कोणतीही बाधा येणार याची काळजी घेणेत यावी.

५) लॉकरमधील मिळालेल्या वस्तु छेडछाड करता येणार नाहीत. अशाप्रकारे सीलबंद पाकिट ठेवावे. तसेच लॉकर उघडताना एखादे बंद पाकिट असल्यास ते उघडू नये त्याची नोंद सुरक्षित ठेवावी. या सर्व नोंदी (Inventory) घेण्यासाठी या धोरणासोबत Inventory of articles left in safety locker (नमुना-११) असा फॉर्म जोडलेला आहे त्यामध्ये सर्व नोदी कराव्यात. त्याचबरोबर ग्राहकास/वारसास/नामांकन केलेल्या व्यक्तीस वस्तू परत देताना त्यांच्याकडून पोहोच घ्यावी. याबाबतचा नमूना Acknowledgement of Inventory of articles सोबत जोडलेला आहे.

१२.२) लॉकर प्रदीर्घ काळ विनाव्यवहाराचे राहिल्यास,

जर लॉकर सात वर्षाच्या कालावधीसाठी विनाव्यवहार असेल तर खालील बाबींची पूर्तता करुन लॉकर ब्रेकओपन करावे-

अ) लॉकरधारकास लॉकर करारनामा समाप्तीपत्र पाठवावे व लॉकर व्यवहार करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत द्यावी. (नमुना ९)

ब) जर लॉकरधारकाने लॉकर करारनामा समाप्तीपत्र पाठविल्यानंतर सुध्दा तीन महिन्यापर्यंत लॉकर व्यवहार केले नाही तर लॉकरधारकास लॉकर ब्रेकओपन संदर्भात पत्र पाठवावे व त्यासाठी लॉकरधारकास अजून तीन महिन्यांचा कालावधी द्यावा. (नमुना १०)

क) जर लॉकरधारकाने लॉकर ब्रेकओपन पत्र पाठविल्यानंतर तीन महिन्यापर्यंत लॉकर व्यवहार केले नाही तर बँक लॉकर ब्रेकओपन करण्यासंदर्भातची नोटीस एक इंग्रजी वर्तमानपत्रातून व दुसरी स्थानिक भाषेतील वर्तमानपत्रात

प्रसिध्द करावी व यामध्ये जर लॉकरधारकाने तीन महिन्यामध्ये लॉकर व्यवहार न केलेस लॉकर ब्रेकओपन केले जाईल असा उल्लेख असावा.

वरील सर्व बाबींची पूर्तता झालेनंतर सुध्दा लॉकरधारकाने लॉकर व्यवहार न केलेस बँकेने खालीलप्रमाणे लॉकर ब्रेकओपन करण्याची कार्यवाही करावी–

१) शाखेने लॉकर ब्रेकओपन करणाऱ्या एजन्सीशी संपर्क साधावा.

२) लॉकर ब्रेकओपन करताना बँकेचा एक अधिकारी तसेच दोन स्वतंत्र साक्षीदार असावेत व या व्यक्तींचा जबाब नोंदवून त्यांच्या सह्या घ्याव्यात.

३) लॉकर ब्रेकओपन करताना पुराव्यासाठी व्हिडोओ शूटींग करण्यात यावे व ते सुरक्षित ठेवण्यात यावे.

४) शेजारच्या लॉकरला कोणतीही बाधा येणार याची काळजी घेणेत यावी.

५) लॉकरमधील मिळालेल्या वस्तु छेडछाड करता येणार नाहीत. अशाप्रकारे सीलबंद पाकिट ठेवावे. तसेच लॉकर उघडताना एखादे बंद पाकिट असल्यास ते उघडू नये त्याची नोंद सुरक्षित ठेवावी. या सर्व नोंदी (Inventory) घेण्यासाठी या धोरणासोबत Inventory of articles left in safety locker (नमुना-११) असा फॉर्म जोडलेला आहे त्यामध्ये सर्व नोदी कराव्यात. त्याचबरोबर ग्राहकास/वारसास/नामांकन केलेल्या व्यक्तीस वस्तू परत देताना त्यांच्याकडून पोहोच घ्यावी. याबाबतचा नमूना Acknowledgement of Inventory of articles सोबत जोडलेला आहे.

१२.३) **जर लॉकरधारकाकडून लॉकरची चावी हरवली असलेस किंवा लॉकरच्या वारसास लॉकर ब्रेक– ओपन करावयाचे असल्यास खालीलप्रमाणे लॉकर ब्रेक– ओपनची प्रक्रिया राबवावी.**

१) संबंधित ग्राहक/ वारस स्वत: उपस्थित असला पाहिजे.

२) शाखेने लॉकर ब्रेकओपन करणाऱ्या एजन्सीशी संपर्क साधावा.

३) लॉकर ब्रेकओपन करताना बँकेचा एक अधिकारी तसेच दोन स्वतंत्र साक्षीदार असावेत व या व्यक्तींचा जबाब नोंदवून त्यांच्या सह्या घ्याव्यात.

४) लॉकर ब्रेकओपन करताना पुराव्यासाठी व्हिडोओ शूटींग करण्यात यावे व ते सुरक्षित ठेवण्यात यावे.

५) शेजारच्या लॉकरला कोणतीही बाधा येणार नाही याची काळजी घेणेत यावी.

६) लॉकरमधील मिळालेल्या वस्तु छेडछाड करता येणार नाहीत. अशाप्रकारे सीलबंद पाकिट ठेवावे. तसेच लॉकर उघडताना एखादे बंद पाकिट असल्यास ते उघडू नये त्याची नोंद सुरक्षित ठेवावी. या सर्व नोंदी (Inventory) घेण्यासाठी या धोरणासोबत Inventory of articles left in safety locker (नमुना-११) असा फॉर्म जोडलेला आहे त्यामध्ये सर्व नोदी कराव्यात. त्याचबरोबर ग्राहकास/वारसास/नामांकन केलेल्या व्यक्तीस वस्तू परत देताना त्यांच्याकडून पोहोच घ्यावी. याबाबतचा नमूना Acknowledgement of Inventory of articles सोबत जोडलेला आहे.

**२) भरपाई व जबाबदारी धोरण :–**

१३.१) **बँकेची जबाबदारी :–**

अ) लॉकर सुरक्षा व ग्राहकाची तपासणी (Due diligence) यासाठी बँकेने पारदर्शक धोरण केलेले आहे.

ब) यामध्ये लॉकर व्यवहार पध्दती, सुरक्षा, अनिधिकृत व्यक्तीचा प्रवेश, ताबा व त्याचबरोबर दरोडा, चोरीपासून सुरक्षा व उपाय याचा उल्लेख असेल. त्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे महत्वाची असतील. (Robbery, Decoities & Theft)

१३.२) **भूकंप, पूर परिस्थिती, वादळ, विजेचा आघात :–**

- काही नैसर्गिक आपतीच्या काळात ही पूर्ण काळजी घेणेत यावी.
- अशा गोष्टी दैवी आघाताने घडत असल्यामुळे याची जबाबदारी ग्राहकाची असेल.
- अशा आघाती परिस्थितीत बँकेने आपल्या लॉकर सुविधेची व मालमत्तेची सुरक्षा या अचानक उद्‌भवणाऱ्या परिस्थितीतून करणे महत्वाचे आहे.

१३.३) **आग, चोरी, दरोडा अथवा बिल्डींग नुकसान झाल्यास अथवा धोकाधडी (Fraud) यामध्ये बँकेच्या कर्मचाऱ्यांचा समावेश असल्यास :**

- बँकेच्या सुरक्षेची जबाबदारी बँकेची आहे.
- वरील प्रकारच्या आपत्ती येणार नाहीत याची बँक जबाबदारीने काळजी घेईल व आपल्या सुरक्षिततेत कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही.
- तरीही बँक आपली जबाबदारी टाळू शकत नाही. म्हणून कोणत्याही पध्दतीने नुकसान झाल्यास अथवा कर्मचाऱ्यांच्या धोकाधडीमुळे झालेल्या नुकसानीस बँक वार्षिक भाड्याच्या १०० पटीत येणाऱ्या रक्कमेस जबाबदार असेल.